# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

दिनांक 20/04/2021 (मंगळवार)

(सायंकाळ)

---

### अवैधरीत्या देशी दारुची
### वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. कळमेश्वर :– दिनांक 19/04/2021 रोजी पोलिस स्टेशन कळमेश्वर चे पथक हे पो.स्टे. कळमेश्वर परिसरात पेट्रलिंग करीत असतांना त्यांना मुखबीरव्दारे माहिती मिळाली की, एक इसम हा एमएच– 49/एफ– 1278 क्रमांकाच्या शेवरलेट कंपनीच्या चार चाकी वाहनामध्ये मोहाफुल गावठी दारूची वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून पोलिस स्टेशन कळमेश्वरचे पोलिस पथकाने गोंडखैरी शिवारातील हिंगणा टि पॉईंट खगराज किराणा स्टोअर जवळ नाकाबंदी करून एमएच– 49/एफ– 1278 क्रमांकाच्या शेवरलेट कंपनीच्या कारला थांबवुन तपासणी केली असता त्यामध्ये 400 लिटर मोहाफूल गावठी दारू कि. 80,000/–रू. चा माल मिळुन आला. आरोपी हा पोलिसांना पाहून पळुन गेला. घटनास्थळावरून मोहाफूल गावठी दारू कि. 80,000/–रू. व वाहन कि. 1,50,000/–रू. असा एकुण 2,30,000/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे सफौ दिलीप सपाटे पो.स्टे. कळमेश्वर यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 65 (अ), (ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ दिलीप सपाटे पो.स्टे. कळमेश्वर मो.नं. 9823998476 हे करीत आहे

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर